श्रध्दांजली

पडद्यावर मूर्तिमंत कारुण्यमूर्ती रंगवणाऱ्या मीनाकुमारीला ३१ मार्च रोजी आपल्यातून जाऊन २९ वर्षं पूर्ण होतील. मात्र आजही तिचं नाव अनेक जुन्या सिनेरसिकांच्या हृदयावर कोरलेलं आहे. त्यानिमित्ताने...



तुम क्या करोगे सुनकर
मुझसे मेरी कहानी...

छाया: ए. एल. सैयद

□ अजित पोपट

दास्तान-ए-मीनाकुमारी

बालकलाकार म्हणून अनेक अभिनेत्रींनी कारकीर्दीची सुरुवात केली असली तरी यातील अनेकींची कारकीर्द त्यांचं बालपण सरण्याबरोबरच अकाली संपुष्टात आली. सारिका, तबस्सुम, नाझ, हनी इराणी वगैरे काही निवडक अभिनेत्रींनी बालकलाकार म्हणून हिंदी सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाची बऱ्यापैकी छाप पाडली. तारुण्यात मात्र त्यांना त्यांची प्रतिभा आणि प्रारब्ध दोन्हीचीही साथ लाभली नाही. याला अपवाद ठरलं एकच नाव मीनाकुमारी.



मोठे सिनेनिर्माता
परंतु नवरा
म्हणून...
कमाल अमरोही



बैजू बावराने
इतिहास रचला.



केवळ चाहतेच नव्हे तर तिचे सहकलाकारही तिच्या आठवणीने आजही गलवलून जातात. अलीकडे सत्कार झालेली वहिदा रहेमान म्हणते, *साहिब बीबी और गुलाम* चित्रपटाच्या वेळी केवळ मीनाकुमारीची उपस्थिती इतरांना उत्कृष्ट अभिनय करण्यास प्रेरणा द्यायची. मीनाकुमारीच्या अभिनयासमोर आपण फिके तर ठरणार नाही असाच विचार प्रत्येकाच्या मनात असायचा.

ग्रेट शोमन राज कपूर तर मीनाकुमारीबद्दल म्हणायचा की, ती आपल्या भूमिकेशी एवढी एकरूप होते की सहकलाकार तिचं तादात्म्य पाहून आपले संवाद विसरतात.

मीनाकुमारी मुळातच एक शायर होती आणि तिचं आयुष्यही एका शायरीसारखंच होतं. 'जी'ला दिलेल्या एका मुलाखतीत मीनाकुमारीने आपल्या 'शायराना अंदाज'मध्ये सांगितलं होतं.


तुम क्या करोगे सुनकर
मुझसे मेरी कहानी
बेलूत्फ जिंदगी के
(बेलूत्फ म्हणजे नीरस, शुष्क)
किस्से है फिके फिके

उत्तम अभिनेत्री असलेल्या मीनाकुमारीला शायरीबरोबर (काव्य) नृत्य, संगीत आणि साहित्याचीही जबर आवड होती. तिची आई इकबाल बेगमही तिच्या काळातील बी ग्रेडची अभिनेत्री होती. तर वडील अली बक्ष १९४०च्या दशकातील संगीतकार. आजोबा म्हणजे इकबाल बेगम यांचे वडील उर्दूचे ख्यातनाम लेखक. साहजिकच साहित्य, संगीत, अभिनय यांचा वारसा मीनाकुमारीला जन्मजात मिळाला होता.

१९३०मध्ये जन्मलेल्या मीनाकुमारीचं मूळ नाव होतं महजबीन. उर्दू भाषेत या शब्दाचा अर्थ आहे चंद्रमुखी. अली बक्ष यांच्या आईला मात्र तिचं नाक चिनी लोकांच्यासारखं म्हणजे थोडं चपटं वाटायचं. म्हणून ती लाडाने महेजबीनला चिनी म्हणत असे. आजीच्या या निरागस थट्टेनेही मीनाकुमारीच्या कोवळ्या मनावर एवढा आघात झाला की ती नेहमी स्वतःला कुरूप समजायची. दिग्दर्शक आणि सहकलाकार तिच्या मनातून हा गंड दूर करण्यासाठी तिला प्रोत्साहित करत.

बी ग्रेडच्या कलाकारांना तेव्हाच्या काळात नाममात्र मेहनताना मिळायचा. त्यामुळे इकबाल-अली बक्ष यांच्या तिन्ही मुली बालपणापासून सिनेमात काम करू लागल्या. महेजबीनची मोठी बहीण खुर्शीद ज्युनियर या नावाने मशहूर झाली होती. खुर्शीद गायिका नायिका होती. दुसऱ्या बहिणीने बेबी माधुरी या नावाने सिनेमात बालभूमिका केल्या होत्या. बेबी माधुरीसाठी प्लेबॅक सिंगर म्हणून महेजबीनने गाणी गायली होती. ती स्वतःही सिनेमात चमकत होती.

एक किस्सा तर गंमतीदार आहे. चार वर्षांची असताना महेजबीनने (१९३६-३७मध्ये) प्रकाश पिक्चर्सच्या *फरजंद-ए-वतन*मध्ये तेव्हाचा आघाडीचा सिनेअभिनेता जयराजच्या मुलीची भूमिका केली होती. काही वर्षांनंतर होमी वाडियांच्या *मजरूह*मध्ये ती जयराज यांची नायिका होती. त्यावेळी दोन दृश्याच्या दरम्यान विश्रांतीच्या वेळी ती जयराजना 'पिताजी... पिताजी...' म्हणून चिडवायची. मसल मॅन असलेले जयराजही खळखळून हसून तिला दाद द्यायचे.



मुलांवर भरपूर प्रेम करणारी मीनाकुमारी

प्रौढ अभिनेत्री म्हणून चमकण्यापूर्वी मीनाकुमारीने बालकलाकार म्हणून चौदा सिनेमांत भूमिका केल्या. नायिका म्हणून तिचा सगळ्यात गाजलेला अविस्मरणीय चित्रपट म्हणजे विजय भट्ट यांचा *बैजू बावरा*. विजय भट्ट यांना खरं तर बडे सितारे घेऊन हा चित्रपट बनवायचा होता. पण प्रकाश पिक्चर्सची आर्थिक स्थिती तेव्हा चांगली नव्हती. संगीतप्रधान चित्रपटात मोठ्या स्टारची गरज नाही असं संगीतकार नौशाद यांनी विजय भट्ट यांना समजावलं आणि काहीसं कचरतच त्यांनी भारत भूषण आणि मीनाकुमारीची निवड केली.

हा लो बजेट चित्रपट लवकरात लवकर पूर्ण व्हावा अशी विजय भट्ट यांची इच्छा होती. याच सुमारास मीनाकुमारी टॉयफॉईडमधून बरी होऊन हवापालटासाठी महाबळेश्वरला गेली होती. तिथे अपघात होऊन तिचा हात मोडला. वेळेवर शस्त्रक्रिया झाली नसती तर गँगरीनने तो कायमचा गमावण्याची वेळ आली होती. मीनाने महाबळेश्वर येथून विजय भट्ट यांना असंख्य संदेश पाठवून 'माझी कारकीर्द अकाली संपेल. मला कामाची गरज आहे. तेव्हा सिनेमातून डच्चू देऊ नका' अशा विनंत्या



फुल और पत्थर धर्मेंद्रबरोबर संवाद पाठ करताना



छाया: ए. एल. सैयद

केल्या. विजय भट्ट यांनी ते ऐकून तिला चित्रपटातून काढलं नाही.

*बैजू बावरा*ने नवा इतिहास रचला. काल-परवापर्यंत *वीर घटोत्कच*, *हनुमान पाताल विजय*, *गणेश महिमा* आणि *लक्ष्मी नारायण*सारख्या पौराणिक-धार्मिक चित्रपटांची बी ग्रेड नायिका असलेली मीनाकुमारी एकदम टॉपच्या अभिनेत्रींच्या पंगतीत बसली. १९५३मध्ये फिल्मफेअर ॲवॉर्ड सुरू झाले. पहिल्याच वर्षी उत्कृष्ट अभिनेत्रीचं पारितोषिक *बैजू बावरा*साठी मीनाकुमारीला मिळालं. नंतर *परिणिता* या सामाजिक चित्रपटासाठीही तिने फिल्मफेअर मिळवलं. *बैजू बावरा*नंतर मीनाकुमारीने मागे वळून पाहिलं नाही. प्रसिद्धी आणि यश तिच्या पायाशी चालत आलं.



एक छंद - स्माईल प्लीज

भूमिकेशी एकरूप होण्याच्या वैशिष्ट्यामुळे मीनाकुमारीने अनेक भूमिकांना यादगार बनवलं. विनोदी भूमिका ती अत्यंत सशक्तपणे करायची आणि गंभीर भूमिकांतही ती चपखल बसायची. दिलीपकुमारसमवेत *आझाद* किंवा *कोहिनूर* किंवा किशोरकुमारबरोबर *अंदाज* किंवा *शरारत*चं उदाहरण घ्या. तिने यात अगदी सहजतेने हलक्याफुलक्या भूमिका केल्यात. याउलट राजेंद्रकुमार नायक असलेला *कहाँ रोशनी कहाँ चिराग* किंवा *दिल एक मंदिर*मधील भूमिकांचा पोत अत्यंत गंभीर होता. यात मीनाकुमारीचा अभिनय डोळे पाणावून टाकणारा होता. काही चित्रपटात तर तिच्या भूमिकेत हलका-फुलका आणि गंभीर असे दोन्ही पैलू होते. उदा. राज कपूरसमवेतचा *शारदा*. यात पूर्वार्धात ती राज कपूरची प्रेयसी आहे तर उत्तरार्धात त्याची आई आहे. सुरुवातीच्या काही दृश्यात तिने प्रेयसी म्हणून खट्याळ अभिनय केला तर नंतर प्रगल्भ जबाबदार मातेचं दर्शन घडवलंय.

वाचून थोडं विचित्र वाटेल, पण १९५०च्या दशकात प्रणयभग्न नायकाच्या भूमिका करून दिलीपकुमार खरोखरीच नैराश्याचा सावज ठरला आणि त्याला मनोचिकित्सकांची मदत घ्यावी लागली होती. तसाच काहीसा प्रकार मीनाकुमारीच्या बाबतीत घडला. मीनाचे पती कमाल अमरोही तयार करीत असलेल्या *दायरे* चित्रपटात टीबी रुग्णाची भूमिका करताना ती भूमिकेशी इतकी एकरूप झाली की खरोखरीच टीबीची रुग्ण बनली. सुदैवाने प्राथमिक टप्प्यात असतानाच टीबीचं निदान झालं आणि वेळेवर उपचार घेतल्याने मीना वाचली.

मीनाकुमारी तिच्या चाहत्यांना लक्षात राहिली ती ट्रॅजेडी क्वीन म्हणूनच. त्याचं कारणही समजण्यासारखं आहे. वास्तव आयुष्यातही तिच्या वाट्याला प्रचंड दुःख आलं. आयुष्यभर ती प्रेमासाठी तहानलेली राहिली. तिला समजून घेणारं, प्रेम करणारं कुणी भेटलंच नाही. कमाल अमरोहीसमवेत लग्न ही तिच्या आयुष्यातील सगळ्यात दुःखद गोष्ट ठरली. कमाल साहित्यिक आणि सिनेनिर्माते म्हणून मोठे असले तरी ते आदर्श पुरुष किंवा पती ठरले नाहीत. मीनाने त्यांच्याशी विवाह केला तेव्हा ती खूप मोठी स्टार होती. कमाल यांनी काही चित्रपट केले असले तरी ते आघाडीचे सिनेनिर्माते कधीच नव्हते. ते स्वभावाने संशयी, शीघ्रकोपी आणि घमेंडी होते. अनेक किरकोळ प्रसंगातून त्यांच्यात आणि मीनात दुरावा निर्माण झाला.

उदाहरणार्थ *मदर इंडिया*च्या एका खास शोच्या वेळी महेबूब खान यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालांशी कमलचा परिचय करून देताना म्हटलं, 'हे आहेत कमाल अमरोही मीनाकुमारीचे पती.' तिथे उपस्थित असलेल्या नर्गीसने महेबूब यांनी केलेली गफलत ओळखून त्वरित 'कमलसाहेब उर्दूचे मोठे साहित्यिक आहेत' असं बोलून सारवासारव करायचा प्रयत्न केला.



प्रसिद्ध छायाचित्रकार ए. एल. सैयदविषयी मीनाकुमारीला आदर होता. म्हणून त्यांच्या विनंतीखातर धर्मेंद्रबरोबरील वैयक्तिक (डावीकडे) क्षणाचे फोटो त्यांना घेऊ दिले. (उजवीकडे) फोटोग्राफर सैयद मीनाकुमारीबरोबर



परंतु कमाल भयंकर संतप्त झाले आणि त्याने महेबूब खान यांच्या चुकीचं प्रायश्चित मीनाकुमारीला दिलं. रात्री घरी त्यांनी तिची भरपूर पिटाई केली. मीना जसजशी सफल अभिनेत्री बनत गेली तसतसा कमाल यांचा न्यूनगंड वाढत गेला. यामुळे मीना इतकी निराश झाली की, तिला दारू आणि तंबाखूचं व्यसन लागलं. व्यक्तिगत जीवनातील दुःख विसरण्यासाठी दारूच्या आहारी जाऊन ती *साहब बीवी और गुलाम*मधल्या 'छोटी बहू'ची भूमिका वास्तवात जगू लागली.

एरवीही तिने पीडित पत्नी, वहिनी आणि आईच्या भूमिकांत प्राण ओतले. *दिल एक मंदिर*ची सीता, *काजल*ची माधवी, *भाभी की चूडियां*मधील वहिनी, *दिल अपना प्रीत पराई*ची नर्स, *मैं चूप रहूंगी*मधील शिक्षिका, *चिराग कहाँ रोशनी कहाँ*ची विधवा सून या तिच्या सगळ्या भूमिका अविस्मरणीय होत्या. तिच्यासमवेत काम करणारे अनेक कलाकारही पुढे यशस्वी झाले. *फूल और पत्थर* पूर्वी धर्मेंद्र एक सामान्य कलाकार होता. मीनाकुमारीबरोबर या चित्रपटात काम केल्यावर तो रातोरात स्टार बनला. *सौतन* या विषयावर चित्रपट बनवणारे सावनकुमार यांनाही निर्माते बनण्यासाठी मीनाकुमारीने बरीच मदत केली होती.

आईच्या भूमिकेत मीनाने अनेक वात्सल्यपूर्ण भूमिका केल्या. तिच्या समवेत काम करणाऱ्या मुलांना तर ती इतका लळा लावायची की, ही मुलं नंतर ती सांगेल तशी वागायची. *मैं चूप रहूंगी*मध्ये काम करणारी मुलं घरी त्यांच्या आई-वडिलांचं ऐकायची नाही तेव्हा ते मीनाकुमारीच्या घरी फोन करायचे. *मैं चूप रहूंगी*च्या सिल्व्हर ज्युबिलीच्या वेळी खास शो आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी सगळी मुलं थिएटरबाहेर पडत असताना आईने कडेवर घेतलेल्या मास्टर बबलूचा बूट गर्दीत खाली पडला. बबलूने रूपेरी पडद्यावरची आई ऊर्फ मीनाकुमारीला हाक मारत म्हटलं, 'मम्मी मेरा बूट गिर गया' सगळी मान्यवर मंडळी आजूबाजूला असताना मीनाकुमारीने कसलाही संकोच न बाळगता खाली वाकून बूट उचलून बबलूच्या पायात घातला.'

*मैं चूप रहूंगी*च्या शूटिंगच्या वेळी काही असे मजेदार किस्से घडले होते. एक दृश्य पूर्ण करून मीनाकुमारी निघण्याच्या तयारीत होती. सेटवरून तिला सरळ विमानतळावर जायचं होतं. मास्टर बबलूला हे कळताच त्याने मीनाकुमारीच्या मोटारीसमोर उभं राहून आरडाओरडा सुरू केला. 'मम्मी मला सोडून जाऊ नको. तेव्हा मीनाकुमारी ग्लिसरिनशिवाय रडली होती.'

बालकलाकारांवर एवढं प्रेम करणाऱ्या मीनाची कूस मात्र कधी उजवली नाही. वदंता अशी की कारकीर्दीत अडथळा नको म्हणून मीनाने गर्भपात केला होता. सोन्याची कोंबडी हातातून जाऊ नये यासाठी कमालनेच तिला गर्भपात करायला सांगितला होता, असंही म्हणतात. काही असेल मीनाला शेवटपर्यंत अपत्यसुख काही लाभलं नाही.

मीनाकुमारी-कमाल अमरोही यांच्या दाम्पत्य जीवनाची एखादी निशाणी मागे उरली असेल तर ती म्हणजे *पाकिजा* चित्रपट. कमाल यांनी १९७०च्या सुमारास मीनाच्या सहकार्याने हा महत्त्वाकांक्षी चित्रपट बनवला. त्याच्या निर्मितीला तब्बल सतरा वर्षं लागली होती. मीना मात्र हा चित्रपट पाहायला हयात राहिली नाही. मुंबईत वयाच्या केवळ एकोणचाळीसाव्या वर्षी तिची प्राणज्योत मालवली. *पाकिजा*ही फार चालला नाही.

मीनाकुमारी पडद्यावर आणि पडद्यामागेही दुःखच जगली. तिच्या मृत्यूचं वर्णन तिच्याच एका शेरातून व्हावं.

उजाले अपनी यादों के
हमारे पास रहने दो
न जाने किस गली में
जिंदगी की श्याम हो जाये

एक नजर - ...जिंदगी की शाम

